International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.3 January – February 2023

# ई - प्रशासन आधुनिक शासनाची गरज

**डॉ. आकाश शेषराव बांगर**
*संशोधक विद्यार्थी, आदर्श महाविद्यालय, हिंगोली*
*Corresponding Author - डॉ. आकाश शेषराव बांगर*
DOI - 10.5281/zenodo.7751336

**प्रस्तावना** :

एकविसावे शतक हे विज्ञान तंत्रज्ञान व संगणक क्रांतीचे युग म्हणून ओळखले जाते. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रचार व प्रसारामुळे जगात अनेक क्षेत्रात क्रांतीकारी बदल झालेले आहेत. प्रशासकिय कार्य व प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अदयावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हे बदल होत असलेले दिसून येत आहेत. समाजातील प्रत्येक व्यक्ति आपलया देनंदिन अडचणी, समस्या, शासन व प्रशासन यंत्रणेने त्वरीत सोडवाव्यात अशी अपेक्षा करतो या करिता संगणकाच्या क्रांतीमुळे प्रशासकिय यंत्रणेत आमुलाग्र परिवर्तन करणे अनिवार्य ठरले. गरीबातल्या गरीब माणसापर्यंत • विकासाचे लाभ पोहोचले पाहिजेत. शिवाय ते टिकाऊ असले पाहिजेत हे प्रशासन जितके कार्यक्षम, जबाबदार व दक्ष असेल तेवढा देशाचा वेगाने विकास होऊ शकेल. म्हणजेच प्रशासन थेट सामान्य माणसापर्यंत पोहोचले पाहिजे. हे प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आधुनिक काळात ई-प्रशासनाची संकल्पना उदयास आली. जगभरातील ई-प्रशासन संकल्पनेमुळे सर्वसामान्य नागरिकांना देण्यात येणाच्या सुलभ सेवाप्राप्ती, वेळेची बचत, पारदर्शकता, अचूकता आणि तत्परता यासारख्या नवगुणांचा शासन व प्रशासन यंत्रणेचा अंतर्भाव होत आहे. कोणत्याही सरकारी योजनांचे लाभार्थी किंवा अन्य नागरिकांना तत्पर सेवा देण्याच्या दृष्टीने ई-प्रशासन ही काळाची गरज बनली आहे. म्हणजेच ई-प्रशासन सरकार व जनता यातील महत्वाचा दुवा ठरला आहे. यामुळे प्रशासनापासून मध्यस्थ व दलालांचा प्रभाव कमी झाला आहे. आजच्या काळात ई-प्रशासनाचे महत्व

वाढत चालले आहे. जगभरातील अर्थव्यवस्थेमध्ये माहिती तंत्रज्ञानाचे महत्व पटले आहे व आर्थिक क्षेत्राच्या उन्नतीसाठी हे तंत्रज्ञान संप्रेरक ठरलं आहे. सदरील शोधनिबंधामध्ये ती प्रशासनाच्या पार्श्वभूमीचा तसेच नागरिकांना देण्यात येणाऱ्या प्रशासनाकडून ई सेवांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**उद्देश** :

१. ई प्रशासनाच्या पार्श्वभूमीचा आढावा घेणे.
२. ई प्रशासनाची संकल्पना अभ्यासणे.
३. प्रशासनाकडून देणाऱ्या ई सेवांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधनात्मक शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग केला आहे. दुय्यम तथ्ये संकलनासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील संदर्भग्रंथ इंटरनेट सेवा इ. माध्यमांचा उपयोग केला आहे.

**तथ्य संकलन:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग केला आहे. त्यात संदर्भग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे, इंटरनेट इ. चा उपयोग केला आहे.

**ई- प्रशासनाची संकल्पना:**

ही संज्ञा इलेक्ट्रोनिक्ससाठी असली तरी ई-प्रशासनात या संज्ञेचा पूर्ण अर्थ प्रशासनाशी जोडलेले आहे. म्हणूनच प्रशासनात इलेक्ट्रॉनिक्सच्या माध्यमातून होत असलेला बदल आणि सुधारणा हा या संकल्पनेचा मूळ गाभा आहे. ई- प्रशासन या संकल्पनेचा अर्थ घ्यायचा झाल्यास इलेक्ट्रॉनिक्स संगणक व माहिती क्षेत्रातील विकसित झालेल्या तंत्राचा प्रशासनात प्रयोग करणे म्हणजे ई-प्रशासन होय. तर व्यापक अर्थाने कोणत्याही संघटना समान तसेच विविध क्षेत्रातील तंत्रास नियंत्रित व विकसित करण्याकरिता माहिती व तंत्रज्ञानाचा प्रयोग

करणे म्हणजे ई-प्रशासन होय. ही एक क्रांतीकारी संकल्पना आहे. एका डिजीटल विश्वातील जोड मानवी जीवनातील दैनंदिन प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनातील विविध कार्य प्रक्रिया सुनियोजितरित्या आणि व्यवस्थित पार पाडण्यासाठी देणे असा अर्थ सांगता येईल. विविध अभ्यासकांनी ई-प्रशासनाची संकल्पना मांडतांना वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत.रॉबर्ट स्वरेच्या मते प्रशासनात वर्षानुवर्ष जी सार्वजनिक सेवा व्यक्तिला दुरध्वनी किंवा टपालाद्वारे दिली जात असे ती सेवा देण्यासाठी इंटरनेटवर आधारित सेवा पुरविण्याच्या पद्धतीला ई-प्रशान म्हणतात. एन. विठ्ठल यांच्यामते शासनाच्या संपूर्ण कामकाजात माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग करणे म्हणजे ई-प्रशासन होय. या संकल्पनेत ई- नागरिकाद्वारे संगणक व इंटरनेटद्वारे आपल्या पसंतीनुसार निवडलेली अशी व्यवस्था की जिच्याद्वारे शासन केले जाते. आजच्या काळात ही संकल्पना सर्व पोहोचली आहे.

**ई-प्रशासनाची पार्श्वभूमी :**

इ.स. १९८० च्या दशकात खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या संकल्पनेमुळे एका नव्या युगाला सुरुवात झाली. एल्वीन टॉपलर यांनी आपल्या the third web या पुस्तकात मानवी सभ्यतेला दोन क्रांतीने प्रभावित केले आहे. त्यात एक कृषी क्रांती व दूसरी औद्योगिक क्रांती ज्या क्रांतीने आधुनिक जीवन प्रदान केले व तिसरी म्हणजे माहिती तंत्रज्ञान क्रांती होय. या क्रांतीने हजारो मैलाचे अंतर एकाच क्लिक मध्ये पार केले. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात जसजसा विकास होत गेला तशा टप्प्यात या संकल्पनेचा विकसित राष्ट्राबरोबरच विकसीशील देशांनीही स्वीकार केला. या सर्वच राष्ट्रांनी याची अंमलबजावणी करताना लोकसंख्या, नागरीगरजा, आर्थिक स्थिती याचा विचार करून ई- अशासनाचे क्षेत्र निश्चित केले. क[illegible]डा हा देश ई-प्रशासनाच्या अमलबजावणीत सर्वात वेगाने विकसित झालेला देश आहे. आज यादेशात बैंक आरोग्य करप्रणाली, यासह सर्व नागरी

लंडनमध्ये ई-प्रशासन हे स्थानिक प्रशासनाने प्रमुख लक्ष ठेवले असून त्यानुसार बहुतांश सेवा ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. शिवाय अमेरिका, इंग्लंड, सिंगापूर ही राष्ट्रे ही ई- प्रशासन संकल्पना पूर्ण क्षमतेने राबवणारी प्रमुख राष्ट्रे आहेत. तसेच आर्थिक राष्ट्रांची जी १७ संघटना असो किंवा संयुक्त राष्ट्रसंघ या सर्वचजागतिक संघटनांना ई-प्रशानाचे महत्व पटले.. इंटरनेटची लाट आल्यावर या ई-प्रशासनाचा वापर करण्यासाठी थेट लोकांना जोडण्या देण्यापूरता न ठेवता त्याचा वापर थेट सरकारी योजना आणि प्रकल्पाच्या कामात प्रभावीपणे व्हायला हवा ही मानसिकता दृढमूल झाली म्हणूनच अमेरिकत खऱ्या अर्थाने ई-प्रशासनाच्या संकल्पनेला चालना मिळाली. तत्कालीन उपाध्यक्ष अल गोअर यांनी या नव्या माध्यमांच्या अंमलबजावणीसाठी पुढाकार घेतला व अमेरिकेला ही यश आले. या संकल्पनेचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. एकविसाव्या शतकातील ज्ञानाधिष्ठित समाजाची गुरुकिल्ली ठरली आहे. माहिती शिवाय प्रशासन शासन किंवा व्यक्तीयांचे अस्तित्व असंभव ठरते. भारतात माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी सन १९७५ मध्ये electronics विभगाची स्थापना करण्यात आली. १५ ऑक्टोबर १९९९ ला electronics विभागणी स्थापना करण्यात आली. त्यानंतर १५ ऑगस्ट २०००: मध्ये स्वतंत्र ई-शासन केंद्र स्थापन केले. सुचना व तंत्रज्ञान अधिनियम २००० नुसार ई-प्रशासनास वैधानिक दर्जा प्राप्त झाला तर इ.स. २००१ है वर्ष ई- गव्हर्नन्स वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरहा प्रकार मिडिया, लब□, एशिया, ई-कृषी, ई-परिक्षा. ई- व्यापार, ई-कॉमर्स तसेच महाराष्ट्र राज्यात सेतू सुविधा केंद्राद्वारे ई-शासन या संकल्पनेस जनसामान्या पर्यंत पोहोचवण्यासाठी इ.स. १९९८ मध्ये भारत सरकारने हैद्राबाद येथे राष्ट्रीय स्माअर शासन संस्थेची स्थापना केली.

**ई-प्रशासनाच्या विकासातील टप्पे :**

'गार्टनर' या आंतरराष्ट्रीय सल्लागार संस्थेने ई-प्रशासनाला चार दम्यात विभागणारे एक मॉडेल तयार केले आहे. यानुसार धोरण

ठरवताना हा प्रकल्प नेमका कोणत्या ठिकाणीलागू करता येवू शकेल याची कल्पना येते. गार्टनरने ई-प्रशासन राबवताना तीन महत्वाचे टप् निश्चित केले. त्याआधारे प्रशान अधिक प्रभावीपणे राबवता येवू शकेल.

**१) माहिती:**

या पहिल्या टप्प्यात १९९० च्या दशकात भर देण्यात आला आहे. या वेबसाईटच्या माध्यमातून विविध सरकारी विभाग व मंत्रालयाची माहिती देण्यात याची तसेच अधिकाऱ्यांचे पत्ते, कार्यालयीन वेळा कामासाठी लागणारे अर्जाचे नमुने नियम व संबंधित विभागासाठी राखून ठेवण्यात आलेला निधीही सर्व माहिती देण्यात यावी.

**२) संवाद:**

या टप्प्यात १९९० नंतर संवादावर भरण्यात आला यात सर्व इंजिन्स, वेबसाईटवरील नेव्हीगेशन्स, सामाजिक विषयावरील माहिती,व्यापार व अन्य परवान्यांसाठी लागणान्या कागदपत्रांची यादी विनंती अर्जाची सोय अशाविविध ऑनलाइन मंजूरी देण्याची सुविधा असावी. या माध्यमातून प्रशसन व जनतेत थेट संवाद होऊ शकला. या दोन टप्यात गार्टनरने ऑनलाइन सेवा पुरवण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे.

**३) आर्थिक व्यवहार:**

या टप्यात संपूर्ण आर्थिक व्यवहार ऑनलाइन करण्यावर भर दिला आहे. तंत्रज्ञानाची व्याप्ती व क्षमता वाढत असताना त्याचा लाभ थेट जनतेला व्हावा हा उद्देश या टप्यात ठेवण्यात आला होता कोणत्याही कार्यालयात न जाता संबंधित योजनासंबंधीचे व्यवहार ऑनलाईन करण्यावर बात भर देण्यात आला. या टण्यात ऑनलाइन सेवेसाठी सर्व पायाभूत यंत्रणा सज्ज झाल्या नंतर सरकार आणि संबंधित घटकाचा थेट संवाद अपेक्षित आहे. जनता उदयोग व्यापार आणि सरकारी संस्थाचा थेट संबंध यामुळे प्रस्थापित होवू शकेल अशी सुविधा उपलब्ध करून देणे ही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

**४) हस्तांतरण:**

या अंतिम टप्प्यात खऱ्या अर्थाने ई-प्रशासनाने उदिष्ट पूर्ण करावयाचे आहे.

यानुसार सामाजातील सर्व लाभार्थीपर्यंत विविध योजनांचे आणि ई-प्रशासनांतर्गत देण्यात आलेल्या ऑनलाइन सोयी प्रशासनांतर्गत देण्यात आलेल्या ऑनलाइन सोयी सुविधांचे लाभ पोहचवण्याचे उद्दिष्ट्ये ठेवण्यात आले आहे. यासाठी देशभरात प्रत्येक ठिकाणी या सेवांचे लाभ मिळवित या हेतूने संबंधित कार्यालयात खास सुविधा पुरवून यात पारदर्शकता राखने हे उद्दिष्ट्ये ठेवण्यात आले. अशा प्रकारे गार्टनरने सुचविलेल्या ई-प्रशासनासाठी पूरक पद्धतीनूसार आज जगभरातील ई- प्रशान कार्यरत आहे.

**प्रशासनाकडून नागरिकांना देण्यात येणाऱ्या ई-सेवा:**

१) **ई-नागरिकत्व:**

प्रत्येक नागरिकाला आपली ओळख पटवण्यासाठी प्रमाणपत्र, मतदान कार्ड, पासपोर्टची आवश्यकता असते. या ओळखपत्रा शिवाय व्यक्तींची ओळख निर्माण होण्याकरिता शासनाने आधारकार्ड सारखी योजना यशस्वी केली त्यामुळे वेगळी ओळख निर्माण करण्याची गरज उरली नाही. म्हणजेच ई प्रशासनाची मदत होवून ई-नागरीकत्व ही संकल्पना साध्य होत आहे..

**२) ई-शिक्षण:**

चार भिंतीत शिक्षण घेण्याची पद्धत कमी होत चालली आहे. देशात परदेशात असणाऱ्या अनेक शेक्षणिक संस्था विद्यार्थ्यांना कमी खर्चात उत्तम शिक्षण देत आहेत. ज्यामुळे राहत्या ठिकाणाहून अनेक नवनवीन संकल्पना माहित होत आहे. ई-शिक्षणाचा भाग असलेल्या ई- ग्रंथालय, प्रकल्पांना अधिक प्रतिसाद मिळत आहे.

**३) ई-आरोग्य:**

नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी अनेक ई-आरोग्य योजना सुरू करण्यात आल्या आहेत. ज्याअंतर्गत रूग्नाची माहिती संगणकामध्ये सुरक्षित ठेवने त्यांना आवश्यक त्या सुविधा देने शक्य होत आहे.

**४) ई-मदत:**

लोककल्याणकारी राज्यामध्ये जनतेची काळजी होणे प्रशासनाची जबाबदारी

आहे. संकटात सापडलेल्या व्यक्तीला विशेषतः महिलांना, बालकांना मदत करण्यासाठी ई- प्रशासनाच्या माध्यमातून ई-हेल्पलाईनची सेवा अनेक ठिकाणी सुरू करण्यात आली आहे.

**५) ई-कर:**

ई-प्रशासनाच्या मदतीने नागरिकांना कर भरणे अधिक सोपे झाले आहे. ई-कर पद्धतीमुळे कार्यालयात लाईनला थांबण्याची आवश्यकता नाही.

**निष्कर्ष**:

ई-प्रशासनामुळे प्रशासन आणि जनता यांच्यातील अंतर कमी झाले आहे. कोणते ही कार्य एका क्लिक वर होत आले. ई-प्रशासनामुळे नागरिकांच्या वेळेत बचत होवू लागली. विविध सरकारी खात्यांची माहिती लोकांना सहजपणे उपलब्ध होत आहे. यामूळे निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग वाढत चालला आहे. प्रशासन कार्यक्षम, जबाबदार व दक्ष झालं आहे. त्यामुळे देशाचे बंगाने विकासहोवू लागला आहे. नागरिकांना तत्पर सेवा देण्याच्या दृष्टीने ई-प्रशासन ही काळाची गरज बनली आहे. याचा परिणाम म्हणजे भ्रष्टाचार कमी होण्यास चांगली मदत होत आहे.

**संदर्भसूची** :

१) व्ही. के. त्रिपाटी ई प्रशासन, नेतृत्व तथा नागरिक प्रशासन, ओमेगा पब्लिकेशन, नवी दिल्ली २०१६.
२) डॉ. शिकारपूर दिपक आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या युगात उत्कर्ष प्रकाशन, पुणे.
३) डॉ. अरविंद कुलकर्णी ई प्रशासन, स्वयदप प्रकाशन, पुणे २०१६.
४) भटनागर सुभाष अनुवाद सुहासिनी ई प्रशासन, डायमंड पब्लिकेशन पुणे २०१०
५) प्रा. जे.के. भालेराव प्रगत लोकप्रशासन, अनुराधा प्रकाशन, पैठण २०१०